आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

११ ऑक्टोबर २०२४ - शुक्रवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रात प्रशिक्षणासाठी राज्य सरकार आणि N I E L I T यांच्यात सामंजस्य करारावर स्वाक्षऱ्या.
- नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या दक्षिण धावपट्टीची चाचणी यशस्वी/ सिडको आणि नवी मुंबई महानगरपालिकेच्या विविध नागरी सुविधा, प्रकल्पांचं मुख्यमंत्र्यांच्या हस्ते लोकार्पण
- विधानसभा निवडणुकांसाठी महायुतीत रिपब्लिकन पक्षाची ८ ते १० जागांची मागणी
- निवडणुका डोळ्यासमोर ठेवून राज्य सरकार घाईघाईत निर्णय घेत असल्याची आदित्य ठाकरे यांची टीका

  **आणि**
- जागतिक शांततेसाठीचा नोबेल पुरस्कार यंदा जपानमधल्या निहोन हिदानक्यो या संस्थेला जाहीर

**<><><><><>**

राज्य सरकार आणि N I E L I T अर्थात राष्ट्रीय इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान विभाग यांच्यात आज नवी दिल्ली इथं सामंजस्य करार झाला. या करारामध्ये कृत्रिम बुद्धीमत्ता क्षेत्रासाठी सेंटर ऑफ एक्सलन्सची स्थापना, रोबोटिक्स, इंडस्ट्री 4.0, राज्यातल्या शासकीय तंत्रनिकेतन आणि अभियांत्रिकी महाविद्यालयातल्या संशोधन आणि विकास केंद्र यांच्यासाठी थ्री डी प्रिंटिंग आणि सहाय्यक तंत्रज्ञानाचा यात समावेश आहे.

यावेळी केंद्रीय इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव आणि राज्याचे उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील उपस्थित होते. या करारामुळे विद्यार्थ्यांना उद्योगासाठी आवश्यक प्रशिक्षण मिळेल, असं मंत्री अश्विनी वैष्णव यांनी सांगितलं.

**<><><><><>**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या दक्षिण धावपट्टीची आज यशस्वी चाचणी झाली. या धावपट्टीवर भारतीय हवाई दलाचं सी २९५ विमान यशस्वीरित्या उतरलं. त्यावेळी सिडको अग्निशमन दलाकडून विमानावर पाण्याचा फवारा उडवत सलामी देण्यात आली. त्यानंतर सुखोई ३० या फायटर विमानानंही धावपट्टीला समांतर उड्डाण केलं.

विमानतळाच्या धावपट्टीची चाचणी झाल्यानंतर पत्रकार परिषद घेण्यात आली. त्याला केंद्रीय विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, मुख्यमंत्री एखनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार, सिडकोचे उपाध्यक्ष विजय सिंघल उपस्थित होते. नवी मुंबई विमानतळावर चार टर्मिनलची उभारणी केली जाणार आहे. या विमानतळावरून दरवर्षी ९ कोटी प्रवासी तर २६ लाख टन माल वाहतूक केली जाईल, असंही मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितलं. नवी मुंबई विमानतळ ठाणे शहराशी तसंच मुंबई विमानतळाशी मेट्रोने जोडणार असल्याचंही मुख्यमंत्री शिंदे यांनी यावेळी सांगितलं.

आधुनिक भारताचा विकास दाखवणारं हे उड्डाण असून यामुळे केवळ नवी मुंबईच नव्हे तर मुंबई आणि राज्याच्या विकासाला चालना मिळणार असल्याचं उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

<><><><><>

सिडकोच्या आणि नवी मुंबई महानगरपालिकेच्या विविध नागरी सुविधा, प्रकल्पांचं लोकार्पण अणि महाराष्ट्र भवनाचं भूमिपूजन ही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते आज वाशी इथल्या सिडको प्रदर्शन केंद्रात झालं. राज्यभरात असलेल्या सिडकोच्या मालकीच्या जमीनी मोकळ्या करण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयाची अंमलबजावणी करताना काही अडचणी येत असतील तर त्या दूर करण्याचा आदेश मुख्यमंत्री शिंदे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिला.

पनवेल महापालिकेचा शास्ती कर रद्द करण्याचा निर्णय घेतल्याचं तसंच महापालिकेच्या परिवहन सेवेत महिलांना ५० टक्के सवलत देण्याचा निर्णयही मुख्यमंत्री शिंदे यांनी यावेळी जाहीर केला. याच कार्यक्रमात ईर्शाळवाडी दुर्घटनेत घर गमावलेल्या काही ग्रामस्थांना प्रातिनिधीक स्वरूपात घराची किल्ली देण्यात आली. तर १३ ग्रामस्थांना सिडकोमध्ये कंत्राटी पद्धतीनं काम करण्यासाठी पत्र देण्यात आली.

<><><><><>

सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे राज्यात विविध ठिकाणच्या रस्त्यांच्या विकासकामांचं भूमीपूजन आज झालं. या कार्यक्रमाला मंत्री रविंद्र चव्हाण दूरस्थ माध्यमातून उपस्थित होते.

यावेळी २४ जिल्हे आणि ४४ विधानसभा मतदारसंघात १२ हजार ७६८ कोटी रुपये किंमतीच्या १ हजार ४८० किलो मीटर लांबीच्या दु-पदरी सिमेंट काँक्रिटीकरण रस्त्यांचं भूमिपूजन झालं.

<><><><>

आज महानवमी म्हणजे नवरात्रौत्सवाचा शेवटचा दिवस असून उद्या विजयादशमी म्हणजेच दसऱ्याचा सण साजरा होईल. महानवमी निमित्त देशभरात नवचंडी यज्ञ, सप्तशती जप, कन्यापूजन अशा विविध धार्मिक कार्यक्रमांचं आयोजन होत आहे. दसऱ्यासाठी झेंडूची फुलं, आंब्याचे टहाळे , तोरणं, आपट्याची पानं यांच्या खरेदीसाठी बाजारपेठा फुलल्या आहेत.

विजया दशमीच्या निमित्ताने  राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने उद्या नाशिक शहरात संचलनाचं आयोजन केलं आहे. शहरातल्या २२ ठिकाणी हे संचलन होईल.

<><><><>

राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी विजयादशमीनिमित्त जनतेला शुभेच्छा दिल्या आहेत. यंदाची विजयादशमी सर्वांच्या जीवनात आनंद, समाधान आणि संपन्नता घेऊन येवो अशा शब्दांत राज्यपालांनी शुभेच्छा दिल्या आहेत.

<><><><>

केंद्रीय पर्यावरण मंत्री भूपेंद्र यादव यांनी आज प्रतापगड किल्ल्यावरच्या मंदिरातल्या भवानी माता मंदिरात अभिषेक केला. यावेळी देवीची आरतीही करण्यात आली. या प्रसंगी खासदार उदयनराजे भोसले यांच्यासह प्रतापगड विकास प्राधिकरणाचे अधिकारी  उपस्थित होते.

<><><><>

नागपूरातील पवित्र दीक्षाभूमीवर आज दीक्षाभूमी स्मारक समितीचे सदस्य आणि समता सैनिक दल यांच्या उपस्थितीत भदंत आर्य नागार्जुन सुरई ससाई यांच्या नेतृत्वाखाली पंचशिल ध्वजारोहण करण्यात आलं. यावेळी समता सैनिक दलाचे जवान, बौद्ध अनुयायी उपस्थित होते.

उद्या धम्मचक्र प्रवर्तन दिनाचा मुख्य सोहळा सायंकाळी साजरा केला जाणार असल्यानं दीक्षाभूमीवर आजपासूनच हजारों बौद्ध अनुयायी दाखल होऊ लागले

आहेत. बौद्ध अनुयायांना प्रशासनातर्फे विविध आवश्यक सोयी सुविधा उपलब्ध करून दिल्या असून धम्मचक्र प्रवर्तन दिनाची जय्यत तयारी प्रशासनानं केली आहे.

<><><><><>

आगामी विधानसभा निवडणुकांसाठी महायुतीमध्ये जागा वाटपाच्या चर्चा अजून सुरू असून रिपब्लिकन पक्षाला ८ ते १० जागांची मागणी करणार आहोत, अशी माहिती केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी आज नागपूर इथे वार्ताहर परिषदेत दिली. या सर्व जागा रिपब्लिकन पक्षाच्या चिन्हावरच लढू असंही त्यांनी स्पष्ट केलं.

<><><><><>

निवडणुका डोळ्यासमोर ठेवून राज्य सरकार घाईघाईत निर्णय घेत असल्याची टीका शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते आदित्य ठाकरे यांनी केली आहे. ते मुंबईत वार्ताहर परिषदेत बोलत होते. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ अद्याप पूर्ण तयार झालेलं नसताना त्यावर विमान उतरवण्याचा स्टंट मुख्यमंत्र्यांनी केला, अशी टीका ठाकरे यांनी केली.

<><><><><>

अभिनेते सयाजी शिंदे यांनी आज राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष अजित पवार यांच्या उपस्थितीत पक्षात प्रवेश केला. अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल आणि इतर यावेळी उपस्थित होते.

<><><><><>

रत्नागिरी तालुक्यातल्या झाडगाव एमआयडीसी क्षेत्रात १९ हजार ५५० कोटी रुपयांची गुंतवणूक होणार असलेल्या वेल्लोर सेमीकंडक्टर प्रकल्पाचं भूमिपूजन आज पालकमंत्री उदय सामंत यांच्या हस्ते झालं. कंपनीतर्फे

रत्नागिरीतल्या दीड हजार युवकांना परदेशात प्रशिक्षण देऊन इथल्या प्रकल्पात नोकरी मिळणार आहे.

**<><><><><>**

मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती योजने अंतर्गत उद्योगमंत्री सामंत यांनी आज रत्नागिरी जिल्ह्यातल्या ६ प्रातिनिधिक लाभार्थ्यांना फिरत्या खाद्यपदार्थ विक्री केंद्राकरता उपयुक्त असलेल्या वाहनांच्या किल्ल्या सुपूर्द केल्या.

**<><><><><>**

अहमदनगरमधल्या संगमनेर इथं आयोजित नारीशक्ती सन्मान कार्यक्रमात ५४ कोटींच्या विकासकामांचं भूमिपूजन आणि लोकार्पण आज महसूलमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांच्या हस्ते झालं.

**<><><><><>**

जागतिक शांततेसाठीचा नोबेल पुरस्कार यंदा जपानमधल्या निहोन हिदानक्यो या संस्थेला जाहीर झाला. हिरोशिमा आणि नागासाकीवर झालेल्या अणुबॉम्ब पीडितांसाठी ही संस्था काम करते. जग अण्वस्त्रमुक्त करण्यासाठी आणि प्रत्यक्षदर्शींच्या कहाण्यांमधून अण्वस्त्रांचा वापर पुन्हा कधीही होऊ नये, यादृष्टीनं या संस्थेनं केलेल्या प्रयत्नांचा सन्मान म्हणून यंदाचा नोबेल शांतता पुरस्कार या संस्थेला देत असल्यानं नॉर्वेजियन नोबेल समितीनं म्हटलं आहे.

**<><><><><>**

उद्योगपती रतन टाटा यांचे सावत्र बंधू नोएल टाटा यांची टाटा ट्रस्टच्या अध्यक्षपदी एकमतानं निवड झाली आहे. टाटा ट्रस्ट ही टाटा समूहाची सामाजिक क्षेत्रात कार्य करणारी शाखा आहे. ट्रस्टच्या संचालक मंडळाच्या बैठकीत आज हा निर्णय घेण्यात आला. नोएल टाटा सध्या टाटा स्टील आणि व्होल्टाससह इतरही कंपन्यांच्या संचालक मंडळाचे सदस्य आहेत.

**<><><><><>**

बेटींग घोटाळा आणि फसवणूक प्रकरणी महादेव बेटींग एपचा सूत्रधार सौरभ चंद्राकर याला दुबईमधे अटक झाली आहे. सक्तवसुली संचालनालयाने गेल्यावर्षी त्याच्यासाठी रेड कॉर्नर नोटीस जारी केली होती. त्याच्या हस्तांतरणाची प्रक्रीया सुरु झाली असून येत्या आठवडाभरात त्याला भारतात आणण्यात येईल असं सूत्रांनी सांगितलं.